SHIKSHAN MANDAL BHAGUR'S,
AFFILIATED TO SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY, PUNE,

# Shri. Eknathrao sahadu shete Arts, Commerce & Science College, Deolali Camp, Nashik

Matoshree Yamunabai Karandikar Shaikshanik Sankul, Sv.No.306/1A/4B/2, Barnes School Road, Deolali Camp, Tal & Dist Nashik-422401.



# CRITERION – III

## Research, Innovation and Extension

## 3.3 Research Publications and Awards

**3.3.2 « Number of books and chapters in edited volumes/books published and papers published in national/ international conference proceedings per teacher during 2019-20 to 2023-24 »**


3.3.2 Number of books and chapters in edited volumes/books published and papers published in national/ international conference proceedings per teacher during 2019-20 to 2023-24.

## Table of Contents

List of Books, Chapters, and papers

A. Year wise total number of List of Books /chapter published..............

| Sr.No. | Title of the book | Name of the teacher | Name of the publisher | Calendar Year of publication |
|---|---|---|---|---|
| 1 | History | Dr. Santosh Dattatray Bodke | Atharva Publication | 2022 |
| 2 | Chodo Bharat Aandolan | Dr. Santosh Dattatray Bodke | Atharva Publication | 2022 |




Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik

Shri Eknathrao Sahadu Shete Arts, Comm. &
Deolali Camp Nashik 422401

Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Art's Comm. & Sci. Senior College,
Deolali Camp, Nashik

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील 'छोडो भारत पर्व' हे भारतीय जनतेने स्वातंत्र्यप्राप्तीच्या दिशेने टाकलेले अंतिम व निर्णायक असे पाऊल. याअगोदर स्वातंत्र्यप्राप्तीसाठी झालेल्या अनेक लहान-मोठ्या चळवळींचा आणि मवाळ, जहाल व क्रांतिकारी अशा अनेक मार्गांचा सार-समन्वय या आंदोलनातून दिसून आला. या सर्व सार समन्वयामागे स्वातंत्र्यप्राप्ती हाच एकमेव उद्देश होता. त्यासाठीच देशभरातील अनेक देशभक्तांनी दीर्घकाळ सुरू असलेल्या या संघर्षाला स्वातंत्र्यप्राप्तीद्वारे पूर्णविराम देण्याचा प्राणांतिक प्रयत्न केला; ज्याची फलश्रुती आपल्याला मिळालेले स्वातंत्र्य ठरले.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या या प्रयत्नांतील क्रांतिपर्व ठरलेले छोडो भारत आंदोलन नाशिक जिल्ह्याच्या स्थानिक पातळीवर राष्ट्रीय घटनांच्या क्रिया-प्रतिक्रियांचे आकलन करून, तसेच समाजातील सर्वसामान्य समाजघटकांना केंद्रभूत मानून, त्यांच्या कार्यकर्तृत्वाची नोंद घेऊन समग्र व संदर्भासह चित्रण करण्याचा प्रस्तुत ग्रंथ माध्यमातून प्रयत्न केलेला आहे. हा ग्रंथ नाशिक जिल्ह्याच्या स्थानिक इतिहासामध्ये, विशेषत: स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासामध्ये भर घालणारा असल्यामुळे इतिहास अभ्यासक, संशोधक व सुज्ञ वाचक या ग्रंथाचे निश्चितच स्वागत करतील, अशी आशा आहे.

– डॉ. संतोष दत्तात्रय बोडके

आता ई-बुक स्वरूपातही
अथर्वची सर्व पुस्तके उपलब्ध...
▸ pejbook.com
▸ amazon.com
▸ Google Play Books
▸ atharvapublications.com

अथर्व पब्लिकेशन्स्
ऑनलाईन पुस्तक खरेदीकरिता...
www.atharvapublications.com

Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik

Shri Eknathrao Sahadu Shete Arts, Comm & Sci. College
Deolali Camp Nashik 422401

Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Art's Comm. & Sci. Senior College,
Deolali Camp, Nashik

# छोडो भारत आंदोलन

(नाशिक जिल्हा विशेष संदर्भ)

डॉ. संतोष दत्तात्रय बोडके

अथर्व पब्लिकेशन्स

Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik

Shri Eknathrao Sahadu Shete Arts, Comm. & Sci. College
Deolali Camp Nashik 422401

Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Art's Comm. & Sci. Senior College,
Deolali Camp, Nashik

## मनोगत

देशभर स्वातंत्र्यप्राप्तीचे अमृतमहोत्सवी वर्ष मोठ्या हर्षोल्हासात साजरे होत असताना आपल्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लढलेल्या, तुरुंगात जाऊन हाल-अपेष्टा सहन केलेल्या व प्रसंगी प्राणार्पण करून हौतात्म्य पत्करलेल्या देशभक्तांच्या कार्यकर्तृत्वाला विनम्र अभिवादन करून, त्यांच्या कार्यकर्तृत्वाला उजाळा देण्यासाठीचा व या देशभक्तांच्या कार्याचे तरुण पिढीला दर्शन घडविण्यासाठीचा एक छोटासा भाग म्हणून यापूर्वी 'भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील नाशिक जिल्ह्याचे योगदान' हा माझा संदर्भग्रंथ आणि १५ ऑगस्ट २०२१ रोजी 'भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील उत्तर महाराष्ट्राचे योगदान' हा संपादकीय ग्रंथ महाराष्ट्रातील ज्येष्ठ इतिहासकार प्रा. (डॉ.) राजा दीक्षित यांच्या मार्गदर्शनाने व त्यांच्या हस्ते प्रकाशित झाला.

सोबतच या विषयांवर मला अनेक शाळा-महाविद्यालयांत व्याख्याने देण्याचेही भाग्य लाभले आणि मुळात 'नाशिक जिल्हा स्वातंत्र्य चळवळ' हा माझ्या संशोधनाचा मुख्य विषय असल्याने, भारतीय इतिहास अनुसंधान परिषद (नवी दिल्ली) यांच्या पुणे विभागीय केंद्राद्वारेही माझे याविषयीचे व्याख्यान त्यांच्या यूट्यूब चॅनलवर प्रसारित करण्यात आले. या सर्व माध्यमांतून नाशिक जिल्ह्यातील जनसमूहाच्या स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाचा आढावा घेऊन तो या संबंध वर्षभरात विविध माध्यमांतून समाजापर्यंत पोहोचविण्याचा माझा प्रयत्न राहिला. या प्रयत्नांमध्ये मदत करणाऱ्या व संधी उपलब्ध करून देणाऱ्या सर्वच घटकांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

या प्रयत्नांचाच एक छोटासा भाग म्हणून आपल्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी देशपातळीवर लढले गेलेले छोडो भारत आंदोलन व त्यामधील नाशिक जिल्ह्याच्या स्थानिक पातळीवरील कार्यकर्तृत्वाचा आढावा या ग्रंथ माध्यमातून घेतलेला आहे.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील छोडो भारत हे महान असे पर्व. या पर्वामध्ये देशभरातील आबालवृद्धांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रयत्न केले. या प्रयत्नात अनेक



Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik

Shri Eknathrao Sahadu Shete Arts, Comm. & Sci. College, Deolali Camp Nashik 422401

Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Art's Comm. & Sci. Senior College,
Deolali Camp, Nashik

देशभक्तांना तुरुंगवास भोगावा लागला; काहींना आपल्या संपत्तीला कायमचे मुकावे लागले व बेघर होऊन परिवाराची हेळसांडही बघावी लागली, तर अनेक देशभक्तांना आपल्या प्राणांचीही आहुती द्यावी लागली. त्यांच्या स्वार्थत्यागाचाच परिणाम म्हणून आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. या स्वातंत्र्यप्राप्तीच्या महान लढ्यातील छोडो भारत पर्वाचा व तोही नाशिक जिल्ह्याच्या विशेषसंदर्भात आढावा घेऊन प्रस्तुत ग्रंथरूपात मांडणी केलेली आहे.

माझ्या या ग्रंथसिद्धीदरम्यान इतिहासाचे नामवंत प्राध्यापक (डॉ.) राजा दीक्षित व डॉ. दिलीप बलसेकर यांच्याशी झालेला संवाद उपयुक्त ठरला. त्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. याबद्दल मी त्यांचे ऋण व्यक्त करतो. प्रस्तुत ग्रंथाला नाशिकचे जिल्हा माहिती अधिकारी श्री. रणजित राजपूत यांनी आपली अभ्यासपूर्ण प्रस्तावना दिली, डॉ. व्ही. पी. बिरारी यांनी आपला अभिप्राय दिला याबद्दल त्यांचेही मी आभार व्यक्त करतो. तसेच हा ग्रंथ प्रकाशनासाठी जळगाव येथील अथर्व पब्लिकेशन्सचे संचालक श्री. युवराज माळी यांनी नेहमीप्रमाणे तत्काळ संमती देऊन सहकार्य केले, याबद्दल मी त्यांचे व त्यांच्या संपूर्ण अथर्व पब्लिकेशन्स परिवाराचे आभार मानतो. ग्रंथ लिखाणास दृश्य-अदृश्य स्वरूपात मदत करणाऱ्या सर्वांचे मी आभार मानतो. प्रस्तुत ग्रंथसिद्धीदरम्यान मला विशेष मदत करणारी माझी पत्नी सौ. सुनंदा व चि. वेदांत यांचाही मी विशेष उल्लेख करतो.

या ग्रंथ माध्यमातून नाशिक जिल्ह्याच्या स्थानिक इतिहासात व प्रामुख्याने स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासामध्ये भर पडणार असल्याने इतिहासाचे विद्यार्थी, शिक्षक, संशोधक व सुज्ञ वाचक या ग्रंथाचे निश्चितच स्वागत व स्वीकार करतील, अशी आशा बाळगतो आणि माझे मनोगत थांबवितो.

– डॉ. संतोष दत्तात्रय बोडके



Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik

Shri Eknathrao Sahadu Shete Arts, Comm. & Sci. College ★ Deolali Camp Nashik 422401

Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Art's Comm. & Sci. Senior College,
Deolali Camp, Nashik

## प्रस्तावना

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त डॉ. संतोष बोडके यांनी लिहिलेल्या 'छोडो भारत आंदोलन : नाशिक जिल्हा विशेष संदर्भ' या संदर्भग्रंथास प्रस्तावना लिहिताना मला विशेष आनंद होत आहे. हा संदर्भग्रंथ नाशिक जिल्ह्याचा, विशेषतः नाशिक जिल्ह्याच्या स्वातंत्र्य चळवळीचा (स्थानिक इतिहास) अभ्यास करणाऱ्या इतिहास अभ्यासकांना, तसेच सर्वसामान्य वाचकांनाही माहितीपूर्ण व उपयुक्त ठरेल, असा मला विश्वास वाटतो. प्रस्तुत ग्रंथामध्ये छोडो भारत आंदोलनामधील नाशिक जिल्ह्यातील योगदान याविषयी संदर्भासह तरीही साध्या, सोप्या व सरळ भाषेत माहितीपूर्ण, उद्बोधक निवेदन केलेले आहे.

प्रस्तुत ग्रंथामध्ये लेखकाने छोडो भारत आंदोलनामध्ये नाशिक जिल्ह्यातील सहाशे पन्नासहून अधिक देशभक्तांच्या कामगिरीचे चित्रण केले आहे, तसेच ग्रंथ लिखाणात अनेक दर्जेदार संदर्भग्रंथ, चरित्र, वृत्तपत्र, शासकीय प्रकाशनाचे अनेक ग्रंथ व समकालीन सरकारी अहवालांचा संदर्भ म्हणून उपयोग केला आहे. त्यामुळे या संशोधन ग्रंथास विश्वासार्हता प्राप्त होत आहे, याबद्दल मी लेखकाचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.

या ग्रंथापूर्वी लेखकाने नाशिक जिल्ह्याच्या स्थानिक इतिहासाचा अभ्यास व संशोधन करून नाशिक जिल्ह्याच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासासंदर्भात 'भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील नाशिक जिल्ह्याचे योगदान', Sources for a History of The Freedom Movement 'Quit India Movement' with Special Reference to Nashik District, 'भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील उत्तर महाराष्ट्राचे योगदान' असे तीन संदर्भग्रंथ लिहिलेले व संपादित केलेले आहेत. या ग्रंथांमध्ये पुन्हा 'छोडो भारत आंदोलन : नाशिक जिल्हा विशेष संदर्भ' या प्रस्तुत ग्रंथाची भर पडत आहे, ही विशेष महत्त्वाची बाब आहे.

लेखकाच्या भावी लेखनकार्यास माझ्या हार्दिक शुभेच्छा...!

**– रणजितसिंह राजपूत,**
जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक



Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik

Shri Eknathrao Sahadu Shete Arts, Comm. & Sci. College
Deolali Camp Nashik 422401

Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Art's Comm. & Sci. Senior College,
Deolali Camp, Nashik

## अभिप्राय

स्वातंत्र्य ही मानवाची महत्त्वपूर्ण अशी नैसर्गिक भावना आहे. त्यामुळे मानव या नैसर्गिक भावनेचे पूर्वापार जतनही करीत आलेला आहे. म्हणूनच आपल्या सर्वांच्या दृष्टीने आधुनिक काळात लढला गेलेला भारतीय स्वातंत्र्यलढा हा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्याचाच एक भाग म्हणून प्रस्तुत 'छोडो भारत आंदोलन : नाशिक जिल्हा विशेष संदर्भ' या ग्रंथामध्ये भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील छोडो भारत आंदोलन व त्यामध्ये नाशिक जिल्ह्याचे योगदान लेखक डॉ. संतोष बोडके यांनी अधोरेखित करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षामध्ये लिहिलेला या ग्रंथाची लेखकाने चार प्रकरणांमध्ये मांडणी केलेली असून, पहिल्या 'विषय प्रवेश' या प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील ब्रिटिश सत्तेच्या पायाभरणीपासून अगदी वैयक्तिक सत्याग्रह चळवळीपर्यंतचा धावता आढावा (नाशिक जिल्ह्याला केंद्रिभूत मानून) घेतलेला आहे. दुसऱ्या प्रकरणामध्ये नाशिक जिल्ह्यातील छोडो भारत आंदोलनाचे स्वरूप स्पष्ट करून चौथ्या प्रकरणामध्ये नाशिक जिल्ह्यातील जनसमूहाचे या आंदोलनातील सहभाग व योगदान लेखकाने स्पष्ट केले आहे आणि शेवटच्या समारोप या प्रकरणामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीची वाटचाल व या आंदोलनाविषयी लेखकाने निष्कर्षांची मांडणी केलेली आहे. प्रस्तुत ग्रंथ लिखाणासाठी मुख्यतः प्राथमिक संदर्भ साधने, दुर्मिळ व शासकीय संदर्भ ग्रंथ आणि चरित्र ग्रंथांचा विशेष वापर केल्यामुळे या लिखाणाला दर्जादेखील प्राप्त झाला आहे.

थोडक्यात, भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील, विशेषतः छोडो भारत आंदोलनातील नाशिक जिल्ह्यातील स्वातंत्र्यसेनानींच्या कार्याची अभ्यासपूर्ण, वस्तुनिष्ठ व संदर्भासह मांडणी केलेला प्रस्तुत ग्रंथ हा विशेषतः छोडो भारत आंदोलनातील नाशिक जिल्ह्याचे योगदान समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरेल आणि सुज्ञवाचक व संशोधक त्याचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

डॉ. संतोष बोडके यांनी एवढ्यावरच न थांबता नाशिक जिल्ह्याचे समग्र इतिहास लेखन करावे, अशी मी अपेक्षा व्यक्त करून त्यांच्या या ग्रंथास व भावी लेखनकार्यास शुभेच्छा देतो...!

**– प्रा. डॉ. व्ही. पी. बिरारी,**
नाशिक

अथर्व पब्लिकेशन्स

Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik

Shri Eknathrao Sahadu Shete Arts, Comm.& Sci. College ★ Deolali Camp Nashik 422401

Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Art's Comm. & Sci. Senior College,
Deolali Camp, Nashik

## अनुक्रमणिका



- प्रकरण १ : विषय प्रवेश ....................................... ११
- प्रकरण २ : छोडो भारत आंदोलन ....................................... ४४
- प्रकरण ३ : नाशिक जिल्ह्याचे छोडो भारत आंदोलनातील योगदान .................. १०७
- प्रकरण ४ : समारोप ....................................... १७५
- परिशिष्टे ....................................... १८२
  - काँग्रेसचा ठराव
  - नाशिक जिल्ह्यातील (निवडक) स्वातंत्र्यसेनानी
  - स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर
  - रघुनाथ हरी गद्रे वकील (दादासाहेब गद्रे वकील)
  - नरहर गोपाळशेठ वाणी ( बागलाणचे बाबा )
  - गोविंद हरी ऊर्फ काकासाहेब देशपांडे
  - भाऊसाहेब सखाराम हिरे
  - वसंतराव नारायणरावजी नाईक
  - दत्तात्रय शंकर पोतनीस (पत्रकारमहर्षी दादासाहेब पोतनीस)
  - दत्तात्रय मल्हार बीडकर (आदिवासी सेवक दादासाहेब बीडकर)
  - हरिभाऊ नानाशेठ बेदरकर (मूळ गाव - सिन्नर)
  - नाशिक जिल्हाधिकारी जे. बुथ यांनी सचिव, गृह विभाग, मुंबई यांना पाठविलेले दैनिक गोपनीय अहवाल (दि. ९ ते २० ऑगस्ट १९४२)
- संदर्भग्रंथ सूची ....................................... २३१
- लेखक परिचय ....................................... २४०




Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik

Shri Eknathrao Sahadu Shete Arts, Comm. & Sci. College ★ Deolali Camp Nashik 422401

Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Art's Comm. & Sci. Senior College,
Deolali Camp, Nashik




Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik

Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Art's Comm. & Sci. Senior College,
Deolali Camp, Nashik

इतिहासकारांचे विचार, विचारप्रवाह आणि त्याचबरोबर त्यांची वर्तमान व गतकाळाविषयीची व्यापक अर्थाची समजउमज इतिहासातून प्रकट होत असल्याने आत्मप्रकटीकरणाचे, तसेच समाजमन व समाजमत निर्मितीचे प्रभावी माध्यम म्हणून इतिहासाकडे पाहिले जाते. अनेक इतिहासकारांनी दिलेल्या इतिहासाच्या विविध व स्थलकालसापेक्ष व्याख्या हे त्याचे पुरेसे आणि समर्पक असे उदाहरण ठरते. थोडक्यात, इतिहासकार आपल्या परिप्रेक्ष्यातून वर्तमान समाजाला गतकालीन समाजजीवनाची सफर घडवून आणतो. मात्र, उपलब्ध परिस्थितीतील अनेक विचार व विचारप्रवाहांतील आपले विचारदृष्टिकोन हे केवळ आणि केवळ एकच बाजू असून, याव्यतिरिक्तही अनेक साधकबाधक उर्वरित व्यापक व प्रगल्भ दृष्टिकोन अज्ञात आणि दुर्लक्षित राहिलेले आहेत. कदाचित याची जाणीव असूनही तो बऱ्याचदा आपल्या विचारांमध्ये भक्कमपणाची फक्त भरच घालण्याच्या प्रयत्नात असतो.

या संपूर्ण पार्श्वभूमीवर अनेक वृत्ती, प्रवृत्ती व प्रकृतीच्या व्यक्ती-व्यक्तींनी बनलेल्या समाजजीवनाचे आणि त्यातील विविध समाजगटांचे बहुअंगी व बहुरंगी जीवनचित्र बराच काळ एकाच रंगाच्या काचेतून अनुभवल्यास ते पुढे पुढे स्पष्ट होत जाण्याऐवजी दिवसागणिक धूसर व अंधुक होण्याची अधिक संभावना असते आणि म्हणूनच समाजरूपी निसर्गात उपलब्ध उर्वरित रंगांची तोंडओळख व प्रारंभिक अनुभूती हे प्रस्तुत ग्रंथाचे प्रयोजन असून, इतिहासाचे विविध विचार व दृष्टिकोनांची इतिहासाच्या व्याख्या, स्वरूप व व्याप्तीच्या माध्यमातून कमीअधिक मात्र मिळतेजुळते इतिहासचित्र रेखाटण्याचा प्रयत्न आहे आणि हा प्रयत्न इतिहासाचे विद्यार्थी, संशोधक व शिक्षकांसाठी निश्चितच उपयुक्त ठरेल, अशी आशाही आहे...

–डॉ. संतोष दत्तात्रय बोडके

•••

आता ई-बुक स्वरूपातही
अथर्वची सर्व पुस्तके उपलब्ध...
pejbook.com
amazon.com
Google Play Books
atharvapublications.com

अथर्व पब्लिकेशन्स्
ऑनलाईन पुस्तक खरेदीकरिता...
www.atharvapublications.com
ISBN 978-93-91718-22-8
Rs - 350/-

IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik

Deolali Camp Nashik 422401

Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Art's Comm. & Sci. Senior College,
Deolali Camp, Nashik

अथर्व पब्लिकेशन्स

# इतिहास
## अर्थ व स्वरूप

© डॉ. संतोष दत्तात्रय बोडके

ISBN : 978-93-91712-22-8
पुस्तक प्रकाशन क्र. ९१४

प्रकाशक व मुद्रक
युवराज भटू माळी

अथर्व पब्लिकेशन्स
धुळे : १७, देविदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे- ४२४ ००१.
संपर्क : ९४०५२०६२३०
जळगाव : शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी,
तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव- ४२५ ००१.
संपर्क : ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
ई-मेल : atharvapublications@gmail.com
वेबसाइट : www.atharvapublications.com

प्रथमावृत्ती : १६ मे २०२२
अक्षरजुळवणी : अथर्व पब्लिकेशन्स
मूल्य : ३५०/-

E-Book *available on*
**amazon.in ▪ GooglePlayBooks ▪ atharvapublications.com**

ऑनलाइन पुस्तक खरेदीसाठी **www.atharvapublications.com**

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.



Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci. Senior College
Deolali Camp, Nashik

Shri Eknathrao Sahadu Shete Arts, Comm. & Sci. Deolali Camp Nashik 422401

Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Art's Comm. & Sci. Senior College,
Deolali Camp, Nashik

आदरणीय गुरुवर्य
प्रा. डॉ. श्री. म. तथा राजा दीक्षित
सुप्रतिष्ठित प्राध्यापक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
यांना
सविनय सादर...

Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik

Shri Eknathrao Sahadu Shete Arts, Comm & Sci. College
Deolali Camp Nashik 422401

Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Art's Comm. & Sci. Senior College,
Deolali Camp, Nashik

## प्रस्तावना

प्रा. डॉ. संतोष बोडके यांनी लिहिलेल्या 'इतिहास : अर्थ व स्वरूप' या ग्रंथास प्रस्तावना लिहिताना मला विशेष आनंद होत आहे. त्यांचा हा ग्रंथ म्हणजे ऐतिहासिक कादंबरी नाही वा चरित्रग्रंथही नाही, तसेच इतिहासाचा स्वतंत्र प्रबंधदेखील नाही. मात्र, संशोधन क्षेत्रातील 'इतिहास म्हणजे काय?' या संकल्पनेच्या यथार्थ दर्शनाबरोबरच अनेक इतिहासकार व विचारवंतांचे विचारधन प्रतिबिंबित करणारा हा ग्रंथ आहे. थोडक्यात, 'इतिहास म्हणजे काय?' या गहन प्रश्नाचे साध्या, सोप्या व सरळ भाषेत आणि इतिहासाच्या विद्यार्थ्यांना केंद्रिभूत मानून लिहिला गेलेला संदर्भग्रंथ, असे मी या ग्रंथाचा उल्लेख करेल.

खरेतर संतोष बोडके हे माझे एम. फिल.चे विद्यार्थी. त्यांनी आपल्या जिज्ञासूवृत्ती व कष्टातून आपले पीएच. डी.पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यांच्या उपजत जिद्द, चिकाटी व कष्ट करण्याची तयारी या गुणांमध्ये आता अधिकची भर पडली असल्याचे मला वाटते. प्रस्तुत ग्रंथाप्रमाणेच त्यांचे 'भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील नाशिक जिल्ह्याचे योगदान', 'Sources for a History of the freedom movement, Quit India movement with special reference to Nasik District', 'स्थानिक इतिहासलेखन (नाशिक जिल्हा)', 'भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील उत्तर महाराष्ट्राचे योगदान' असे संदर्भग्रंथ, संपादित ग्रंथ आणि अनेक शोधनिबंध हे त्यांच्या कष्टाची व संशोधक गुणांची जाणीव करून देतात. त्यामुळे त्यांचे या क्षेत्रातील भविष्य उज्ज्वल असल्याचे लक्षात येते.

प्रस्तुत ग्रंथ हा इतिहासाचा अर्थ व स्वरूप सांगणारे सैद्धांतिक भाष्य असून ते विशद करण्यासाठी लेखकाने ग्रंथाची तीन प्रकरणात मांडणी केलेली आहे. पहिल्या प्रकरणात विषय प्रवेश करताना त्यांनी इतिहासाचे स्वरूप व व्याप्ती विशद करून त्यांचे मानवी जीवनातील महत्त्व व उपयोगिता अधोरेखित केली आहे. इतिहास हे एक सामाजिकशास्त्र असल्यामुळे त्याचा थेट संबंध मानवी

जीवनातील भूतकाळातील घटना व घडामोडींपर्यंत पोहोचतो. गत ... ातील या महत्त्वपूर्ण मात्र मुक्या घटनांना समकालीन साधनांच्या आधारे बोलते करण्याचे कार्य इतिहास संशोधकाला करावे लागते. इतिहासात मानवी जीवनातील सर्वच अंग, उपअंगांचा, तसेच पृथ्वीवरील अगदी सर्वच प्राणी, पक्षी व वनस्पतींचाही समावेश होत असल्याने व्यापक अर्थाने इतिहास हा विषय विषयांचा विषय ठरतो. तो जाणून घेतल्यास मानवाला वर्तमानात प्रेरणा मिळून भविष्यकाळाचा वेधही घेता येतो. गतकालीन इतिहासातून धडा न घेतल्यास इतिहास धडा शिकविल्याशिवाय राहत नाही. प्रस्तुत प्रकरणात या सर्व बाबींचा विविध मुद्यांच्या आधारे लेखकाने परामर्श घेतलेला आहे.

ग्रंथाच्या दुसऱ्या प्रकरणात 'इतिहास म्हणजे काय?' या मूळ मुद्याकडे वळून लेखकाने विविध इतिहासकार व विचारवंतांच्या इतिहासविषयक संकल्पनांचा शोध घेऊन त्या सूत्ररूपात गुंफून एकाच छताखाली आणल्या आहेत. हे कार्य डॉ. बोडके यांनी मोठ्या चिकाटीने केले असून, या सर्वांचा अर्थही त्यांनी अगदी सोप्या व ओघवत्या भाषेत उलगडून दाखविला आहे. त्यामुळे त्यांची या विषयातील बौद्धिक मशागत भक्कम होण्यास मदत झाली आहे, तशीच ती या क्षेत्रातील विद्यार्थी, संशोधक, शिक्षक व सामान्य वाचकांनाही पूरक ठरणार आहे.

इति+ह+आस म्हणजे असे असे घडले. अर्थात, इतिहासाचा शोध घेताना गतकाळात काय घडले, का घडले, कसे घडले व केव्हा घडले? इत्यादी प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतात. त्यामुळे कालक्रमाच्या प्रत्येक टप्प्यावर जे जे घडले, त्याचे सत्य कथन वा वृत्तांत म्हणजे 'इतिहास' होय, ही इतिहासविषयक स्थूल संकल्पना सर्वज्ञात झाली आहे. मानवी जीवनातील असंख्य घटना व घडामोडी केव्हा तरी घडून गेलेल्या असतात. त्या कालौघात विस्मृतीत जमा होतात. त्या ज्ञात करून घेणे, त्यासाठी त्यांचा तपास करणे, चौकशी करणे व त्यात दडलेले सत्य व तथ्य शोधून काढणे, हे इतिहास या विद्याशाखेचे मुख्य काम असते. मुळात Historia या ग्रीक शब्दाचा अर्थही चौकशी करणे, शोध घेणे, असाच होतो. वर्तमानकालीन मानवी जीवनातील बऱ्याच समस्यांची मुळे ही भूतकाळात रुजलेली असतात. त्यावर उतारा शोधण्यासाठी इतिहासात डोकावे लागते. घटना-घडामोडींतील सत्यही विविधांगी असू शकते. त्यासाठी इतिहास क्षेत्रातील निरनिराळे विचारप्रवाहही तपासून घ्यावे लागतात. या सर्वांतूनच सत्याच्या जवळ पोहोचता येते. लेखकाने प्रस्तुत प्रकरणात इतिहासाच्या विविध व्याख्यांच्या माध्यमातून या सर्व प्रक्रियांवर उत्तम प्रकाश टाकला आहे.

शेवटच्या प्रकरणात समारोप करताना लेखकाने प्रकरणनिहाय आढावा घेऊन मानव व मानवी समाज हा इतिहास अध्ययन व संशोधनाचा केंद्रबिंदू असल्याचे स्पष्ट केले आहे. प्रस्तुत ग्रं ... 'इतिहासाचा अर्थ व स्वरूप' सांगताना काहीअंशी पुनरुक्ती झाली असली, तरी ती अभ्यासकांच्या मशागतीसाठी आवश्यक आहे, असे मला प्रामाणिकपणे वाटते. या ग्रंथातील प्रकरणनिहाय संदर्भ व शेवटी जोडलेल्या संदर्भ सूचीवरून लेखकाने ग्रंथासाठी घेतलेले संदर्भ व सोबतच त्यांचे कष्टही दिसून येतात. थोडक्यात, कोणत्याही विद्याशाखेच्या विद्यार्थ्याला इतिहास म्हणजे काय? हे समजून घेण्यासाठी हा ग्रंथ पुरेसे संदर्भसाधन आहे. अर्थात, या सर्वांमुळे प्रस्तुत ग्रंथ हा विविध विद्यापीठांतील इतिहास व अन्य सामाजिकशास्त्रांच्या पदवी, पदव्युत्तर पदवी, संशोधक विद्यार्थी तसेच प्राध्यापकांसाठीही उपयोगी ठरेल, यामध्ये शंका वाटत नाही.

मी डॉ. संतोष बोडके यांना प्रस्तुत ग्रंथलेखनाबरोबरच त्यांच्या पुढील लेखन व संशोधनकार्यासाठी हार्दिक शुभेच्छा देतो...!

**– प्रा. डॉ. व्ही. पी. बिरारी,**
सेवानिवृत्त प्राध्यापक, नाशिक

Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik

Shri Eknathrao Sahadu Shete Arts.Comm & Sci.College ★ Deolali Camp Nashik 422401

Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts Comm. & Sci. Senior College,
Deolali Camp, Nashik

## अभिप्राय

ऐतिहासिक संशोधन पद्धती हे एक तंत्र आहे. यामध्ये भूतकाळातील घटना वर्तमानकाळात अभ्यासल्या जाऊन त्या घटना जशा आहेत तशाच अचूक व वस्तुनिष्ठपणे सादर करणे, अपेक्षित असते. एकंदर या सर्वांतून इतिहास संशोधन व लेखन प्रक्रिया लक्षात येते.

इतिहास ही मानवाची कहाणी आहे. इतिहास : अर्थ व स्वरूप या ग्रंथात डॉ. संतोष बोडके यांनी या मानवाच्या कहाणीचे अर्थात इतिहासाचा अर्थ व इतिहासाचे स्वरूप यांचे साध्या व ओघवत्या भाषेत विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच या ग्रंथामध्ये त्यांनी काल्पनिक व भावनिक मांडणीस बगल देऊन इतिहासाचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करताना अभ्यासपूर्ण व संदर्भासह मांडणी केली आहे. त्यामुळे इतिहासाचे विद्यार्थी व संशोधक यांना इतिहास संशोधन व इतिहास लेखन प्रक्रिया समजून घेण्या अगोदर इतिहास म्हणजे काय ? हे समजून घेण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त ठरणारा आहे.

थोडक्यात, प्रस्तुत ग्रंथ हा इतिहास म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर शोधणाऱ्या मराठी भाषेतील इतिहास लेखनपर ग्रंथांमध्ये आपले आगळेवेगळे स्थान निर्माण करणारा ठरेल, अशी आशा आहे.

**– डॉ. लहू गायकवाड**
प्राध्यापक,(पदव्युत्तर संशोधन केंद्र)
ग्रामोन्नती मंडळाचे,कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे- ४१०५०४

Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik



## मनोगत

'इतिहास : अर्थ व स्वरूप' हा ग्रंथ आपल्यासारख्या सुज्ञ वाचकांच्या हाती देताना मला विशेष आनंद होत आहे. खरेतर विद्यार्थी जीवनात इतिहास म्हणजे नक्की काय? इतिहासाचे स्वरूप काय? इतिहासाचे अध्ययन का करावे? असे अनेक प्रश्न पडणे स्वाभाविक असते. प्रस्तुत ग्रंथाच्या माध्यमातून या व अशा अनेक प्रश्नांची समाधानकारक उत्तरे शोधण्याचा एक छोटासा प्रयत्न आहे. यासाठी इतिहास अध्ययन व अध्यापनादरम्यान काढलेल्या नोंदींची संख्या वाढत जाऊन आज या नोंदी ग्रंथरूपात आकार घेत आहेत, हे विशेष.

निश्चितच याअगोदर पूर्णतः कधीही न उलगडणाऱ्या इतिहास म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर अनेक विद्वानांनी आपापल्या विचारमाध्यमातून दिलेले आहे. या विषयासंदर्भात मात्र आपापली भिन्न मतेही नोंदविली आहेत. इतिहासाच्या विविध व्याख्या व त्यांचे विवेचन अगदी साध्या व सोप्या भाषेत विद्यार्थी वर्गापर्यंत पोहोचविण्याचे ग्रंथाचे प्रयोजन आहे. प्रस्तुत ग्रंथ म्हणजे स्वतंत्र वा मूलभूत संशोधन नसले, तरी इतिहासलेखन शास्त्राचे मराठी व इंग्रजी या भाषांतील अनेक ग्रंथांचे संदर्भ आणि विचारवंतांची मते संदर्भ म्हणून नोंदविली असल्याने ग्रंथाला मूल्यदेखील प्राप्त झाले आहे. अर्थात, त्यामुळे इतिहास विषयाच्या वस्तुनिष्ठ अध्ययन व आकलनासाठी प्रस्तुत ग्रंथाची संशोधक विद्यार्थ्यांना निश्चितच मदत होईल, अशी आशा आहे.

वर्तमान विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात मानवाचे जीवन धावपळीचे बनलेले आहे. बऱ्याचदा 'वेळ नाही, उसंत नाही!' अशी वाक्ये कानी पडत असतात. तेव्हा मानवाच्या या व्यस्त दिनक्रमाचा व त्याच्या गतिप्रगतीचा आणि त्याचबरोबर मानवाच्या या संपूर्ण धावपळीमागील आवश्यकतेचा व उपयोगितेचा विचार समोर येतो. सध्याचे विज्ञान-तंत्रज्ञानाचे युग असूनही मानवाला आपल्या पारंपरिक भावभावनांचे पालन करावे लागते. यातील एक महत्त्वाची भावभावना

Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts Comm. & Sci. Senior College

म्हणजे जिज्ञासा ही होय. मानवाच्या गतकाळाविषयीची [illegible]ासापूर्तीचे अर्थात गतकालिन व्यक्ती, समाज व संस्कृतीचे अध्ययन करणाऱ्या इतिहासासारख्या विषयाला विसरून चालत नाही; किंबहुना त्याच्याच आधारावर मानवाला वर्तमानाची ओळख करून भविष्यकालीन गोष्टींची मांडणी करावी लागते. अर्थात, त्याहीपुढे जाऊन इतिहास आपल्या पूर्वजांची गौरवशाली परंपरा व पराक्रमाची कथा सांगत असल्याने, सर्वांनाच तो प्रिय व आपलासा असतो. वर्तमानकालीन मानव गतकालीन इतिहास विसरल्यास भविष्यकाळ घडवू शकत नाही, या विधानातूनही इतिहासाचे महत्त्व अधोरेखित होते. वर्तमान पिढीने ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानाबरोबरच आपल्या गौरवशाली इतिहासाचा संदर्भ घेऊन उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करावी व त्याचाच एक भाग म्हणून 'इतिहास म्हणजे नक्की काय?' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे.

माझ्या शैक्षणिक जीवनाच्या वाटचालीत आदर्श व मार्गदर्शक ठरलेले शिक्षणक्षेत्रातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व सर डॉ. मो. स. गोसावी, सचिव - गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक यांचे मी ऋण व्यक्त करतो. आमच्या महाविद्यालयाचे उपक्रमशील व सतत प्रोत्साहन देणारे प्राचार्य डॉ. राम कुलकर्णी यांचेही मी आभार व्यक्त करतो. माझ्या इतिहासविषयक अध्ययन, लेखन व संशोधनाच्या वाटचालीत मार्गदर्शक ठरलेले व ग्रंथाला आपली अभ्यासपूर्ण प्रस्तावना देणारे डॉ. व्ही. पी. बिरारी तसेच प्रस्तुत ग्रंथाला अभिप्राय देणारे डॉ. लहू गायकवाड यांचेही मी आभार मानतो. हा ग्रंथ प्रकाशनासाठी अथर्व प्रकाशनचे संचालक श्री. युवराज माळी यांनी नेहमीप्रमाणे तात्काळ संमती देऊन मदत केली, याबद्दल मी त्यांचे व त्यांच्या संपूर्ण अथर्व प्रकाशन परिवाराचे आभार मानतो. ग्रंथ लिखाणास दृश्य अदृश्य स्वरूपात मदत करणाऱ्या सर्वांचे मी आभार मानतो. प्रस्तुत ग्रंथ सिद्धीदरम्यान मला विशेष मदत करणारी माझी पत्नी सौ. सुनंदा व चिरंजीव वेदांत यांचाही मी विशेष उल्लेख करतो.

इतिहासाचे विद्यार्थी, संशोधक व शिक्षक या ग्रंथाचे निश्चितच स्वीकार करतील, अशी आशा बाळगतो व माझे मनोगत थांबवितो.

– डॉ. संतोष दत्तात्रय बोडके

Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik



## अनुक्रमणिका

- *प्रकरण पहिले :*
  इतिहासाचे स्वरूप ........................................ १३
- *प्रकरण दुसरे :*
  इतिहासाच्या काही व्याख्या ........................................ ४६
- *प्रकरण तिसरे :*
  समारोपाकडे ........................................ १५७
- संदर्भग्रंथ सूची ........................................ १७८

Shri Eknathrao Sahadu Shete Arts, Comm. & Sci. College Deolali Camp Nashik 422401

Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Art's Comm. & Sci. Se[illegible] College
Deolali Camp, Nashik

Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik



# इतिहासाचे स्वरूप

**विषय प्रवेश –**

सध्याचा काळ हा मानवी जीवनातील अतिउच्च अशा ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानाचा काळ आहे. आधुनिकतेने संपूर्ण मानवी जीवन व्यापून झपाट्याने ते पूर्णतः बदलूनही टाकले आहे. आजच्या धावपळीच्या युगात मानवाला काय योग्य? काय अयोग्य? काय चांगले? काय वाईट? इतकेच नव्हे; तर कोणता आभास आहे आणि कोणती वास्तवता आहे, यामध्ये फरककरणेदेखील अवघड होत चालले आहे. बहुतांशी वर्तमान मानवी जीवनाचे हे चित्र रेखाटले जात असले, तरी मानवाला व्यक्ती व समाजजीवनविषयक गतकाळातील अनुभवांची वर्तमानाशी पद्धतशीर सांगड घालून, त्यांचा सारासार विचार करून अधिक सर्वंजस व समतोल दृष्टिकोन बाळगून भविष्याबद्दल आशावादी राहणे, हे दैनंदिन जीवनव्यवहारासाठी व पुढील पिढीचे विशेषत्वाने कल्याण साधण्यासाठी आणि समाजजीवनात एकजिनसीपणा आणण्यासाठी आवश्यक असते. त्यासाठी मुळातील आपल्या जीवनाचे स्वतःच अंतर्गत व बाह्य जगत, अशा दोन भागांत विभाजन करून या अंतर्बाह्य जगतामध्ये समन्वय साधणे अपेक्षित असते. या समन्वयाशिवाय व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनाचा गाडा सुव्यवस्थितरीत्या चालणे होत नसते आणि मुख्य म्हणजे या दोन्हींमध्ये समन्वय साधण्यासाठीच मानव जीवनभर धडपड करीत असतो.

मानवाच्या बाह्य जीवनाला भौतिक उपलब्धतेतून समृद्धता प्राप्त होत असली, तरी मानवाच्या अंतर्गत जीवनाला सुखावणाऱ्या गोष्टींचा शोध हा सतत सुरूच राहतो, मानवाचा हा शोध कधीही न संपणारा अर्थात सतत सुरू राहणारा असाच असतो. ती मनाला भावेल, पटेल अशा स्थिरावणाऱ्या गोष्टींच्या निरंतर शोधात असतो. [illegible] मानवाची ही शोधयात्रा कायमच सुरू असते. तिला [illegible] अंत नसतो. [illegible] शोधाचा एक भाग असतो तो म्हणजे काळाचा.

Shri Eknathrao Sahadu Shete Arts, Comm. & Sci. College Deolali Camp Nashik 422401
Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts Comm. & Sci. Senior College
Deolali Camp, Nashik

गतकाळ समाजाने अनुभवलेला असतो व भविष्यकाळाबद्दल तो आशा ठेवून वर्तमानात उत्साहाने जगत असतो. त्याच्या वर्तमानातील सर्व क्रिया-प्रतिक्रिया; किंबहुना त्याचे एकंदर स्वभाववर्तन हे बऱ्याच अंशी भविष्याकडे सकारात्मक दृष्टी व आस लावून असते. मात्र, मानवाला आशावादी वाटणारा भविष्यकाळ हा नेहमीच अनिश्चित व अनपेक्षित स्वरूपाचा असतो, त्याविषयी अंदाज बांधणे कठीणच नव्हे; तर अशक्यप्राय असते. अर्थात, त्यामुळेच मानवाच्या जिज्ञासापूर्तीला लाभलेला पर्याय म्हणून व आपल्या वर्तमान जीवनाचे पायाभूत साधन म्हणून मानव गतकाळाकडे अधिक विश्वासाने पाहत असतो.

तसेही वर्तमान समाजस्थिती ही आपल्या सद्यःकालीन अस्तित्वाचे मूळ इतिहासकाराला गतकाळातच शोधण्यासाठी प्रेरित करीत असते आणि गतकाळ हा मानवाने कधी ना कधी पाहिलेला, अनुभवलेला वा संदर्भसाधनांतून दृश्य-अदृश्य स्वरूपात अभ्यासलेला असल्याने मानवाचा त्यावर विश्वासही असतो. गतकाळ हा भविष्याप्रमाणे अनिश्चित कधीच नसतो; किंबहुना तो स्थिर, न बदलणारा व मानवी जीवनाला मार्गदर्शन करणारा असाच असतो. त्यामुळे मानव हा भविष्यापेक्षा गतकाळातील घटनांना अधिक महत्त्व देऊन त्या आधारावर भविष्यकाळाचे नियोजन करून अधिकाधिक आराखडे बांधत असतो आणि तसेही गतकाळात व गतकालीन घटनांमध्ये बदल होत नसल्याने तो समजून घेणे, हे मानवी बुद्धीच्या आवाक्यातही असते. त्यामुळेच गतकाळातील मानव व समाजजीवन समजून घेण्यासाठी अर्थात ते समाजजीवन कशा प्रकारचे होते? गतकालीन समाजात मानव कसा राहत होता? कसा विचार करीत होता? मानव व समाज यांच्यातील संबंध कसे होते? किंबहुना ते कसे निर्माण झाले? व कसे वाढीस लागले? तसेच त्यामध्ये सलग व सातत्यपूर्ण असे बदल कशा प्रकारे घडून आले? वर्तमानात भेडसावणाऱ्या या व अशा अनेक प्रश्नांचे व समस्यांचे निराकरण तो गतकाळात शोधू लागतो. त्यामुळे गतकाळाला वर्तमान संदर्भ चिकटतात. अर्थात, इतिहास संशोधनाची मूळ प्रेरणा ही प्रामुख्याने वर्तमान समाजस्थिती हीच असते. या माध्यमातून मानवी जिज्ञासापूर्तीचा प्रयत्न न थांबता, न संपता तो अधिकच जोमाने सतत सुरूच राहतो. मानवाच्या या सततच्या प्रयत्नांतूनच त्याला आपले व्यक्तित्व आणि समाजाचे अस्तित्व याचे संपूर्ण दर्शन इतिहासात पाहायला मिळत असते; ज्यासाठी स्वतः इतिहासही कार्यरत असतो.[3]

इतिहासकार या त्रिज्या व परीघ नसलेल्या इतिहास वर्तुळाचे संशोधन व लेखन करताना गतकाळातील अनेक दस्तऐवजांच्या व संदर्भांच्या आधारावर भूतकाळाची मांडणी करीत असतो. ही मांडणी करीत असताना इतिहासकार प्रामुख्याने सत्य घटनांवर, घटनाक्रमावर व वस्तुस्थितीवर भर देत असतो, घटनांविषयी व आपल्या स्वतःशीच बोलत असतो, घटनांचे स्वतःशीच चिंतन करीत असतो. त्याशिवाय उत्तम व दर्जेदार अशा इतिहासाची निर्मिती होत नाही. असे असूनही आधुनिक काळात इतिहासलेखनातील विविधतेमुळे व विविध विचारप्रवाहांमुळे आणि त्यांच्याही उपप्रवाहांमुळे इतिहास अध्ययन व इतिहास संशोधनात वैचारिक आणि वैविध्यपूर्ण अशा विचारदृष्टीची दिवसेंदिवस भर पडत चालली आहे.[4] निश्चितच त्यासाठी संशोधकाला इतिहास संशोधनाच्या खडतर मार्गातून जावे लागते.

संबंधित घटनेसाठीच्या अनेक संदर्भांचे केवळ शब्दार्थच नव्हे; तर त्यांचे भावार्थही लक्षात घेऊन घटनेतील सत्य शोधून काढावे लागते. संशोधकाला स्वतःशी व या सर्व संशोधन प्रक्रियेदरम्यान आपल्यातील संशोधक आणि संशोधकवृत्ती जागी ठेवून, आपली चिकाटी, आपला संयम व सत्याची चाड सतत जिवंत ठेवावी लागते. त्यामुळेच गतकालीन समाजजीवनाच्या भावभावना, आशा-आकांक्षा, रीतिरिवाज, प्रथा-परंपरांचा शोध घेतानादेखील इतिहासकार केवळ संदर्भसाधनांच्या मदतीने त्याने जे पाहिले, त्याने जे अनुभवले व जे घटनेतील सत्य त्याला जाणवले, अंतःप्रतीत झाले, तेच तो इतिहास माध्यमातून व्यक्त करण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यामुळेच इतिहासकार गतकालीन मानवाच्या गुण-दोषांची, जय-पराजयाची, दया-कौर्याची, यश-अपयशाची, सुख-दुःखाची एकसारख्याच व समान दृष्टिकोनातून व समान सूत्राने बांधणी करून वस्तुनिष्ठ मांडणी करीत असतो. त्याशिवाय त्याचे अध्ययन, संशोधन व इतिहासलेखन पूर्ण झाले, असे म्हटले जात नाही.

अशा प्रकारे संशोधकाला इतिहास संशोधनाच्या खडतर मार्गातून गेल्याशिवाय घटना व घटनाक्रमातील सत्य सापडत नाही, ही बाब उघड असते आणि तसेही इतिहासकार त्याला गतकालीन घटनांमध्ये सापडलेल्या संदर्भसाधनांच्या व सत्याच्या आधारावरच इतिहासाचा शास्त्र म्हणून दर्जा अबाधित राखत असतो. त्यासाठीच इतिहासकार लेखन करताना, घटनांमधील कार्यकारणभाव मांडताना, घटना व घटनेतील सत्य सिद्ध करताना गतकाळातील संदर्भ व पुराव्यांना (इतिहास साधनांना) महत्त्व देत असतो; किंबहुना इतिहासाला पक्षपातीपणा मानवत नसल्याने इतिहासकार हा सत्य घटनांच्या, संदर्भसाधनांच्या व पुराव्यांच्या आधारानेच तो आपले लेखनकार्य पूर्ण करीत असतो.[5]

**इतिहासाचे स्वरूप व व्याप्ती –**

आपण नक्की कोणता विषय अभ्यासत आहोत? नक्की कोणत्या विद्याशाखेचे ज्ञान घेत आहोत? तो विषय व त्या विद्याशाखेचे निश्चित असे स्वरूप काय आहे? आणि त्यांची वाटचाल ही नक्की कोणत्या दिशेने होत आहे? याची




Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Shri Eknathrao Sahadu Shete Arts Comm. Sci. College Deolali Camp Nashik 422401
Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Art's Comm. & Sci. Senior College,
Deolali Camp, Nashik

आपल्याला माहिती असणे आवश्यक असते. त्यामुळेच या ठिकाणी इतिहासाच्या स्वरूपाची चर्चा क्रमप्राप्त ठरते.

'स्वरूप' या शब्दाचा अर्थ एखादी वस्तू किंवा संकल्पना कशी भासते; किंबहुना मुळात व स्वभावतः ती कशी असते? तिचे कार्य काय असते? तिची कार्यक्षमता कशी व किती असते? तिची कमीत कमी सूक्ष्मता व जास्तीत जास्त व्यापकता किती असते? याबरोबरच तिची लांबी, रुंदी, उंची, वजन, खोली व एकूणच तिचे दृश्य आकारमान आणि आभासमान रूप कसे असते? या सर्व प्रश्नांची एकत्रित उत्तरे म्हणजेच त्या वस्तू वा संकल्पनेचे स्वरूप असते. याशिवाय, ती वेगवेगळ्या व्यक्तींना कशी वाटते; किंबहुना ती मुळात कशी असते, यासोबतच वेगवेगळ्या विचारांच्या व्यक्तींच्या विचारांतील त्यासंदर्भातील साम्य व भेद हेदेखील वस्तूचे स्वरूप लक्षात घेण्यासाठी उपयुक्त ठरते. प्रथमदर्शनी वस्तू, व्यक्ती किंवा संकल्पनेचे स्वरूप चटकन लक्षात येत नाही. मात्र, त्याच वस्तू व व्यक्तीचे अनुभवानंतर, संकल्पनेचे विचार आणि चिंतनानंतर व एकूणच अध्ययनानंतर स्वरूप लक्षात येत असते. मात्र, स्वरूप ही संकल्पनाच मुळात स्थिर नसून ते सदैव गतिमान असते.

काळानुरूप प्रत्येक घटकात होणारा बदल हा त्यातील स्वरूपात बदल करीत असतो. थोडक्यात व्यक्ती, वस्तू, घटनेचे अध्ययन व अनुभवातून स्वरूप लक्षात घेता येते. मात्र, ते दीर्घकाळ टिकून राहीलच, याची शास्वती नसते. त्यामध्ये कालानुक्रमे बदल होत असतात. येथे आपल्या अभ्यास विषयासंदर्भातील बाब लक्षात घेता, आपण अभ्यासत असलेल्या विषयाची अर्थात इतिहासाची ओळख करून संबंधित विषयाचे दिवसागणिक वाढत जाणारे स्वरूप समजून घेणे आवश्यक असते. त्यामुळे गतकालीन ऐतिहासिक घटना व लिखित इतिहासाचा अर्थ लावताना मदत होते, तसेच इतिहासाचे निश्चित आयाम, निश्चित कार्यपद्धती, निश्चित स्वरूपाची मूलभूत स्थायी लक्षणे व या लक्षणांचे स्वरूप, तसेच इतिहासाची इतर ज्ञानशाखांहून असलेली भिन्नता व तिची स्वतंत्र स्वायत्तता आणि तिच्या स्वतंत्र स्वरूपामुळे इतर ज्ञानशाखांशी असलेले तिचे अंशतः साम्य व मूलभूत भेददेखील स्पष्ट होतात.[६] या संपूर्ण विवेचनाचा सार एवढाच की, अभ्यास विषयाचे अर्थात इतिहासाचे स्वरूप लक्षात घेणे आवश्यक आहे.

थोडक्यात म्हणजे इतिहास विषयाच्या स्वरूपाचे एक चिरकालीन व दुसरे काळानुसार बदलणारे अशा दोन प्रकारची वैशिष्ट्ये आहेत. त्यांपैकी चिरकालीन, सर्वकालीन वैशिष्ट्य ही इतिहासाच्या मूलभूत स्वरूपाचे दर्शन घडवितात.

» ''गतकाळातील मानवी जीवनातील वास्तव, लौकिक व संस्मरणीय घटनांचे तर्कशुद्ध व वस्तुनिष्ठपणे पुनर्संशोधन करून त्यांची प्रभावी, परिणामकारक व रंजकरीत्या मांडणी करणे, हे इतिहासाचे अपरिवर्तनीय वैशिष्ट्य आहे.''



Co-ordinator, IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik

इतिहासाच्या या सर्वकालीन वैशिष्ट्यांबरोबर इतिहास संशोधनासाठी निवडले जाणारे विषय, त्या विषयांचे केले जाणारे मूल्यमापन व गतकालीन घटनेचा लावलेला अन्वयार्थ हे इतिहासाचे कालपरत्वे बदलणारे, तत्कालिक वैशिष्ट्य आहेत, ज्यामध्ये स्थळ-काळ संदर्भानुसार बदल होऊ शकतात किंवा बदल होतात. इतिहासाच्या या चिरकालीन व तत्कालीन वैशिष्ट्यांतून त्याचे स्वरूप लक्षात घेण्यास मदत होते.[७]

इतिहासाचे अध्ययन करताना त्याच्या स्वरूपाबरोबरच व्याप्तीदेखील लक्षात घेणे आवश्यक असते. आजवरची इतिहासाची व्याप्ती लक्षात घेता, समग्र गतकाळ; त्यामध्ये व्यक्ती, समाज, संस्कृती, राष्ट्र आणि संपूर्ण विश्व व त्यातील प्रत्येक महत्त्वाची घटना आणि घडामोडी; किंबहुना पृथ्वीतलावरील संपूर्ण मानवजातीचा व तिच्या सर्वांगांचा (उदाहरणार्थ - राजकीय, सामाजिक, आर्थिक, वैचारिक, भौगोलिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक इत्यादी) इतिहास अपेक्षित आहे.

इतिहासामध्ये सर्व विषय व विद्याशाखांना सामावून घेण्याची शक्ती आहे. त्यामुळे इतिहास ही सतत विकसित व दिवसेंदिवस व्यापक होत जाणारी गतिशील अशी ज्ञानशाखा ठरली आहे.[८] त्यामुळेच दिवसागणिक इतिहासाची व्याप्ती वाढतच गेलेली दिसून येते. इतिहासाचे स्वरूप व व्याप्ती समजून घेण्यासाठी इतिहासाच्या वेगवेगळ्या काळातील व्याख्या महत्त्वाचे माध्यम व मार्ग बनून अभ्यासकांच्या समोर येतात आणि जसा एकच प्रकाश निरनिराळ्या रंगांच्या काचांमधून पाहिल्यास तो वेगवेगळ्या रंगांचा असल्याचा आभास होतो, तसेच इतिहासाचे होते. इतिहास प्रकृतीने एक असूनही वेगवेगळ्या व्याख्यांमधून त्याचे वेगवेगळे रूपरंग व स्थळ-काळ-वैशिष्ट्ये दृष्टीस येतात; जे इतिहासाचे वास्तव स्वरूप व व्याप्ती समजून घेण्यासाठी उपयुक्तही ठरतात.

**मानव व समाज संबंध –**

व्यक्ती व व्यक्तींपासून समाजाची निर्मिती होत असते. त्यामुळे एका अर्थाने मानव हा समाजाचा निर्माता असतो, तर दुसऱ्या अर्थाने समाज व्यक्तीचे संरक्षण, तसेच नियमित पालनपोषण करीत असल्याने व्यक्ती हा समाजाचे अपत्यही ठरतो. त्यामुळेच मानवाला समाजशील व समाजप्रिय प्राणी, असेदेखील म्हटले जाते. नैसर्गिक, मानवाचे जन्मानंतर लगेचच समाजाशी नातेसंबंध जोडले जातात. या नातेसंबंधांतूनच त्याला अनेक अधिकारांची प्राप्ती व कर्तव्यांची जाणीवही होत असते.



Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Art's Comm. & Sci. Senior College
Deolali Camp, Nashik
Shri Eknathrao Sahadu Shete Arts, Comm. & Sci. College, Deolali Camp, Nashik 422401

मानवाचा जन्म व मृत्यू आणि त्यादरम्यानचे त्याचे संपूर्ण जीवन हे समाजकक्षेतच आकारास येऊन त्याला सामाजिक पर्यावरणाची प्राप्ती होत असते आणि व्यक्ती व सामाजिक पर्यावरणाचा परस्परांवरील प्रभावाचे परिणामस्वरूप व्यक्तीच्या सामाजिक विश्वातील वाढही ठरत असते. या माध्यमातून व्यक्ती जीवनाला आकार प्राप्त होण्यास मदत होते आणि त्यातूनच व्यक्तिजीवनाचे स्वरूप व मूल्ये निर्धारित होत जातात. अशा प्रकारे समाजामध्ये व्यक्तिजीवनाला खरा आकार व अर्थ प्राप्त होत असतो.[९] अशा या व्यक्ती व संपूर्ण समाजजीवनाला व्यापण्याचे सामर्थ्य असलेल्या इतिहासाची दिवसागणिक व्याप्ती वाढण्याचे कारणही त्यामध्ये सामावलेले दिसते. त्यामुळेच इतिहासदृष्टीला एका अर्थाने मानवी जीवनातील आदर्शाचा, उदात्ततेचा, अनुकरणीयतेचा, समतोलाचा व सुसंवादाचा शोध असल्याचे दिसते. कारण, मानवाला कधीही एकटे न सोडण्याची इतिहासाची प्रतिज्ञा असते. त्यासाठी इतिहास संशोधक समाजजीवनाचा सत्याप्रत जाणारा शोध घेत असतो. सत्यदर्शन हा त्याचा ध्यास असतो. आपल्या तर्कबुद्धी व कल्पनाशक्तीच्या आधारे व्यक्ती व समाजजीवन रेखाटण्यात तो गुंतलेला असतो.

थोडक्यात; परंतु व्यापक दृष्टीने इतिहासकार गतकाळातील समाजजीवनाचे वास्तवचित्र रेखाटत असतो. व्यक्ती व समाजजीवनातील पुरातन नातेसंबंध उलगडण्याचा त्याचा प्रयत्न असतो. तो समाजमूल्ये मांडत असताना त्याची विचारसाधना, एकाग्रता व संदर्भसाधनांची उपलब्धता, विपुलता व विश्वसनीयता हाती घेऊन आपल्या लिखाणात प्रगल्भता आणत असतो. कारण, इतिहासकाराला जे सांगायचे असते, ते ऐकणारा व निर्मितीची प्रेरणा देणाराही समाजच असतो. व्यक्ती व समाजजीवनातील सातत्यामुळे आणि बदलामुळे इतिहास हादेखील सतत प्रवाहित असतो. या निरंतर प्रवाहित इतिहासाला शब्दांच्या जाळ्यामध्ये बांधण्याचे कार्य इतिहासकाराला करावे लागते. त्यामुळे इतिहासाच्या जीवनकक्षेत अनेक क्षेत्रांचा समावेश होत असतो आणि या क्षेत्रपरत्वे व्यक्ती व समाजनिहाय इतिहास संशोधनाचे मार्गही प्रशस्त होत असतात.

व्यक्ती हा समाजाचा निर्माता व त्याच वेळी तो संबंधित समाजाचा एक अविभाज्य असा सदस्य (घटक) असल्याचे त्याला भान ठेवावे लागते. व्यक्तीला समाजात घटक म्हणून विशिष्ट असे स्थान असल्याने समाजात वावरताना समाजाने नेमून दिलेली भूमिका व जबाबदारी व्यक्तीला विसरून चालत नाही, तर त्या भूमिकेचे व जबाबदारीचे त्याने यथोचित पालन करणे अपेक्षित असते. समाजात व्यक्तीच्या भूमिका व स्थानाप्रमाणे व्यक्तीच्या वर्तनाचीही अपेक्षा असते. अर्थात, या सर्व गोष्टींच्या प्राप्तीसाठी व्यक्तीला आपल्या अंतर्बाह्य अशा जीवनघटकांमध्ये समन्वय साधावा लागतो. एकूणच व्यक्तीचे समग्र अंतर्बाह्य जीवन [illegible]

स्वरूपाचे असते.

आकलनासाठी आपण त्याचे वेगवेगळे भाग करीत असलो, तरी व्यक्तिजीवनाचा व त्याच्या वर्तनाचा निष्कर्ष लावणे आजवर कुणालाही शक्य झालेले नाही आणि अशा या अनेकविध व्यक्ती व व्यक्तिसमूहांचा, त्यातील वृत्ती-प्रवृत्तींचा समाजात समावेश झालेला असतो. व्यक्ती व व्यक्तींपासून बनलेल्या समाजातील संबंधांचे जाळे असलेल्या एकजीव समाजामध्ये व्यक्तिजीवनाला आकार मिळत असतो व या क्रियेप्रक्रियेसोबतच समाजजीवनाचीही जडणघडण होत असते.[१०] अशा बहुअंगी व्यक्ती व व्यक्तिजीवनाचे समाज हे एकजिनसी मिश्रण व अविभाज्य असे रसायन असते. परिस्थितीनुरूप आलेली मानवी व नैसर्गिक आव्हाने त्यांना महत्कार्यापर्यंत पोहोचवीत असतात. त्यांच्या कार्यक्रियांतून अनेक महत्त्वाच्या घटना घडत असतात व एकापाठोपाठ एक अशा अनेक घटनांची संपूर्ण मालिका पूर्ण होत असते. इतिहास संशोधक गतकाळातील ही संपूर्ण प्रक्रिया समजावून घेऊन वर्तमान स्थिती-परिस्थितीचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत असतो. निश्चितच इतिहासात घटना या केंद्रिभूत व महत्त्वाच्या असतात; पण त्याहीपेक्षा महत्त्वाची असते, ती म्हणजे प्रक्रिया. घटना या त्या व्यापक प्रक्रियेचा भाग असतात.[११] एकदा प्रक्रिया लक्षात आली म्हणजे घटना व घटनाक्रम समजून घ्यायला सोपे जाते. अशा प्रकारे, संशोधकाचे संपूर्ण विचारविश्व हे व्यक्ती, समाज व त्यांचे अंतर्संबंध यांच्या निश्चितीचे कार्य करण्यात आणि त्यांच्या संबंधातील जटील समस्यांच्या निराकरणांना, उत्तरांना अधोरेखित करण्याचा एक भाग बनलेले असते.

**इतिहास, समाज व व्यक्तिजीवन –**

स्वभावतःच इतिहासामध्ये असंख्य गोष्टी व अनेक घटक सामावून घेण्याचे शक्तिसामर्थ्य असल्यामुळे त्या त्या काळातील सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक स्थितीचे, आर्थिक घडामोडींचे आणि ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञानाने केलेल्या प्रगती व मानवी जीवनातील सर्वांगाचे एकत्रित समाजजीवनावर [illegible] अगदी लहान-मोठे परिणाम व संगतवार बदल इतिहासामध्ये प्रतिबिंबित [illegible] दिसतात; त्याचबरोबर इतिहास संशोधन व अध्ययनाच्या माध्यमातून [illegible] समाजजीवनाचे अर्थपूर्ण चित्रणही झालेले दिसते आणि तसेही व्यक्ती व व्यक्तिजीवनातूनच समाज बनलेला असल्याने आणि सामाजिक संबंधातून [illegible] आधार, आकार व अर्थ प्राप्त होत असल्याने व्यक्ती, समाज व इतिहासाचे निर्मात्र एकपदरी व एकजीव असे नाते असल्याचे दिसून येते.

[illegible] दैनंदिन दिनक्रमाव्यतिरिक्त कृती करण्यास भाग पाडणारा [illegible] अस्तित्वात असतो आणि तो भाग म्हणजे मानवाचे

Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik

Shri Eknathrao Sahadu Shete Arts, Comm. & Sci.College Deolali Camp Nashik 422401

Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci. Senior College
Deolali Camp, Nashik

२७. जोशी, लक्ष्मणशास्त्री (प्रमुख संपा.), ठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, खंड १३, १९८७.
२८. जोशी, पं. महादेवशास्त्री, भारतीय संस्कृती कोश, खंड पहिला, भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे.
२९. जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, खंड १३, १९८७.
३०. ठाकूर, रवींद्रनाथ, वासुदेव विश्वनाथ गोखले (अनु.), महात्मा गांधी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९८५.
३१. ढवळे वि. ना., साहित्याचे नवीन भाषा तत्त्वज्ञान, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९७.
३२. तटसरे, वि. दी. आणि इतर, सामाजिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जुलै २००९.
३३. देव, प्रभाकर, इतिहासशास्त्र, ब्रेनटॉनिक पब्लिकेशन, नाशिक, २००७.
३४. देवरे, सुधीर, कला आणि संस्कृती : एक समन्वय, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती, २००३.
३५. देशमुख, प्रशांत, इतिहासाचे तत्त्वज्ञान, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २००५.
३६. देवस्थळे, सुमती, एक विचारवंत : कार्ल मार्क्स, विश्वकर्मा साहित्यालय प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७९.
३७. दीक्षित, राजा, इतिहास, समाजविचार आणि केशवसुत, लोकवाङ्मय प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९९३.
३८. दीक्षित, राजा, प्राचीन व मध्ययुगीन भारताचा इतिहास, इयत्ता अकरावी, प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे.
३९. दीक्षित, राजा, माणसाची गोष्ट, इयत्ता तिसरी, इतिहास पुस्तक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
४०. धर्माधिकारी, हेमचंद्र, सामाजिक तत्त्वज्ञान, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी भारत मुद्रक आणि प्रकाशक लि., औरंगाबाद, पहिली आवृत्ती, मार्च १९८०.
४१. नेमाडे, भालचंद्र, टीका स्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९०.



४२. नेहरू, पंडित जवाहरलाल, अनुवाद, साने गुरुजी व ना. वि. करदीकर, भारताचा शोध, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, चतुर्थ आवृत्ती, २०१०.
४३. पत्की, वि. बा., जनसंपर्क शास्त्र आणि पद्धती, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९८९.
४४. पत्की, श्री. मा., शिक्षणाची उगमस्थाने, मिलिंद प्रकाशन, बीड, प्रथमावृत्ती, १९७६.
४५. भोसले, नारायण, डॉ. आंबेडकरांनी केलेली इतिहास मीमांसा, अथर्व पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती, २०१३.
४६. माजीद, हुसेन, मानवी भूगोल, के सागर पब्लिकेशन्स, पुणे. मोरवंचीकर, रा. श्री., इतिहास लेखनशास्त्र व इतिहासकार, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जून १९९९.
४७. मोरवंचीकर, रा.श्री., इतिहास लेखनशास्त्र व इतिहासकार, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जून, १९९९.
४८. मोरवंचीकर, रा. श्री., प्राचीन भारताची सांस्कृतिक ओळख, य.च. म. मु.विद्यापीठ, नाशिक.
४९. राजदेरकर, सुहास., इतिहास लेखनशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९८.
५०. रेगे, मे. पु. (प्रमुख संपादक), मराठी विश्वकोश, खंड १६ वा., महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९९९.
५१. वरखेडे, रमेश व मंगला वरखेडे, संशोधन पद्धतीशास्त्र, इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज इंजिनिअरींग, नाशिक, पहिली आवृत्ती, २०१३.
५२. वाड, विजया., मराठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, खंड १८.
५३. वांबुरकर, जास्वंदी (संपा.), इतिहास संशोधनातील नवीन प्रवाह, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१४.
५४. सरदार, गं. बा., संत वांङ्मयाची सामाजिक फलश्रुती, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, चातुर्थावृत्ती, १९८२.
५५. सवदी, ए. बी., कोळेकर, पी. एस.., मानवी भूगोल, निराली प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जून, २०१५.
५६. सरदेसाई, बी. एन., इतिहासलेखनपद्धती, फडके प्रकाशन, द्वितीयावृत्ती, कोल्हापूर, २००५.
५७. सावंत, बी.बी., टी. एस. साळुंखे, ऐतिहासिक कागदपत्रे व स्थळे,



Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik

Shri Eknathrao Sahadu Shete Arts, Comm & Sci. College ★ Deolali Camp Nashik 422401

Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Art's Comm. & Sci. Senior College,
Deolali Camp, Nashik

# संदर्भग्रंथ सूची


इंग्रजी ग्रंथ –

१. Ali, B., History: Its Theory and Method, Macmillan India Limited, New Delhi, Second Edition, 2001.

२. Amato, Joseph A., Rethinking Home, A case study for Writing Local History, University of California press, California, 2002.

३. Chitnis, K.N., Research Methodology in History, Atlantic Publishers and Distributers, Delhi, 2006.

४. Rowse, A.L., The use of History, Hodder and Stoughton Limited, London, Second impression, 1946.

५. Sreedharan E., a Textbook of Historiography 500 BC to AD 2000. Orient Black Swan Private Limited, First Published 2004, Reprint 2014.

६. Will and Ariel Durant, The Lessons of History, Simon and Schuster, New York, 1968.

मराठी ग्रंथ –

७. आठवले, सदाशिव, इतिहासाचे तत्त्वज्ञान, प्रकाशक- चिटणीस-प्राज्ञ पाठशाला मंडळ, वाई, सातारा, १९६७.

८. आगलावे, प्रदीप, समाजशास्त्र संकल्पना आणि सिद्धांत, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, तृतीयावृत्ती, २००९.

९. आगलावे प्रदीप, संशोधन पद्धतीशास्त्र व तत्त्वे, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, २०००.

१०. ओक, पु. ना., भारतीय इतिहास संशोधनातील घोडचुका, मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीयावृत्ती, १९९६.

११. कर्वे, इरावती, मराठी लोकांची संस्कृती, देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती, १९५१.

१२. कार, इ. एच., अनुवाद, वि. गो. लेले, इतिहास म्हणजे काय?, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१०.

१३. कुलकर्णी, अ. रा., मराठ्यांचे इतिहासकार (इतिहास लेखनपद्धती), डायमंड पब्लिकेशन्स, प्रथमावृत्ती, २००७.

१४. कुलकर्णी, वा. ल., साहित्य- शोध आणि बोध, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६७.

१५. कुलकर्णी, कल्याण, कौटिलीय अर्थशास्त्र आणि आधुनिक भारतीय अर्थव्यवस्था, विहंग प्रकाशन, पुणे, २००७.

१६. कोमेजर, हेन्री स्टील, इतिहास स्वरूप आणि अभ्यास, अनु. कृ. ना. वळसंगकर, मॅजिस्टिक बुक स्टॉल, मुंबई, प्रथमावृत्ती, १९६९.

१७. कोत्तापल्ले, नागनाथ, साहित्याचा अवकाश, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००३.

१८. कोसंबी, डी. डी., प्राचीन भारतीय संस्कृती व सभ्यता, डायमंड पब्लिकेशन, पुणे, मराठी प्रथम आवृत्ती, २००६.

१९. कोठेकर, शांता, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, २००५.

२०. कोत्तापल्ले, नागनाथ, संपादक, साहित्य आणि समाज, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००७.

२१. खेरा, शिव, यश तुमच्या हातात, मॅक मिलन इंडिया लिमिटेड, दिल्ली, मराठी प्रथमावृत्ती, २००२.

२२. गणोरकर, प्रभा, डहाके वसंत (संपादक), वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश, भटकळ फौंडेशन, मुंबई, प्रथमावृत्ती, २००१.

२३. गायकवाड, हनमाने, सरदेसाई, इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९९६.

२४. गोखले, रामचंद्र महादेव, आर्थिक इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, १९७१.

२५. जाधव, रा. ग., साहित्य व सामाजिक संदर्भ, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, २००३.

२६. जावडेकर, आचार्य शंकर, आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण, २००९.



Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik



Shri Eknathrao Sahadu Shete Arts, Comm. & Sci. College, Deolali Camp, Nashik 422401



Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Art's Comm. & Sci. Senior College,
Deolali Camp, Nashik.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९२.

५८. साने, ह. श्री., सामाजिक शास्त्रे आणि साहित्य : अंत:संबंध, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

५९. सुंठणकर, बा. र., बुद्धी, प्रेरणा आणि क्रांती, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, १९६८.

६०. सिरसीकर., वसंत मंजुनाथ., राज्यशास्त्र आणि शासनसंस्था, प्रकाशक सौ. सुधा सिरसीकर, पुणे, द्वितीयावृत्ती, १९५९.

Co-Ordinator
IQAC
Shri Eknathrao Sahadu Shete
Arts, Comm. & Sci.Senior College
Deolali Camp, Nashik





## डॉ. संतोष दत्तात्रय बोडके

एम. ए., एम. फिल., सेट, पीएच. डी. (इतिहास)

» संशोधन क्षेत्र : स्थानिक इतिहास मुख्यत्वे नाशिक जिल्हा.

» अनुभव : २००९ पासून इतिहास विषयात पदवी व पदव्युत्तर वर्ग अध्यापन.

» गोखले एज्युकेशन सोसायटीचे चांडक बिटको चांडक नाशिक रोड महाविद्यालय, नाशिक येथे इतिहास विभागात कार्यरत.

» अनेक महाविद्यालयांत विविध विषयांवर व्याख्याने, तसेच राज्यस्तरीय व राष्ट्रीय परिषदेत सहभाग.

» आजवर २० हून अधिक शोधनिबंध सादर व प्रकाशित.

**प्रकाशित ग्रंथ –**

१. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील नाशिक जिल्ह्याचे योगदान, इ. स. १८८५ ते १९४७, अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव, २०१७.

२. Sources for the History of the freedom movement in India, Quit India Movement with special reference to Nashik District, Editor - Publisher, Nashik, 2018.

३. संपादक व सहलेखक, स्थानिक इतिहास लेखन (नाशिक जिल्हा), प्रकाशक-संपादक, नाशिक, २०१९.

४. इतिहास : अर्थ व स्वरूप, स्वातीधन इंटरनॅशनल प्रकाशन, नाशिक, २०२०.

५. संपादक व सहलेखक, भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील उत्तर महाराष्ट्राचे योगदान, इ. स. १८८५ ते १९४७, अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव, २०२१.

Shri Eknathrao Sahadu Shete Arts Comm. & Sci. College ★ Deolali Camp Nashik 422401

Principal
Shri Eknathrao Sahadu Shete
Art's Comm. & Sci. Senior College,
Deolali Camp, Nashik